**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - थकित - २०२०/२०२०-२१/१२/वेतनपथक, पुणे दिनांक - ०१ फेबुवारी, २०२१

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,

शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

कुलसचिव,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

**विषय - सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील थकित देयकांची माहिती सादर करणेबाबत.**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामधील आपल्या थकित रक्कमांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे आणि विहीत विवरणपत्रातील माहिती तयार करावी. या प्रस्तावामध्ये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये ज्यांची नव्याने वेतननिश्‍चिती करण्यात आलेली आहे आणि यापूर्वीच्या वर्षांमध्ये सादर करण्यात आलेल्या थकित रक्कमांच्या प्रस्तावांमध्ये ज्या कर्मचा-यांचा समावेश करण्यात आलेला नाही अशा सर्व प्रस्तावांचा समावेश करण्यात यावा. सदरहू प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खाली दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये माहिती देताना व्यक्तीनिहाय माहिती सादर करावी आणि त्याचे फरकाचे तक्ते, वेतननिश्‍चितीच्या प्रती सोबत जोडण्यात याव्यात. तसेच न्यायालयीन प्रकरणातील थकित रक्कमेच्याबाबतीत मा. न्यायालयाने दिलेले आदेश व त्या अनुषंगानेचा सर्व प्रस्ताव आवश्यक आहे. विद्यापीठ उशीरा मान्यतेच्या प्रस्तावाचे बाबतीत या कार्यालयाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत, विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेची प्रत, या कार्यालयाने केलेली वेतननिश्‍चिती आणि फरकाचे तक्ते सोबत जोडण्यात यावेत. सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील फरकाची माहिती Microsoft Excel मध्ये देखील सादर करण्यात यावी. सदरहू प्रस्ताव यापूर्वी सादर केलेले असतील तरी देखील सदरहू सर्व प्रस्ताव पुन्हा एकदा सादर करणे आवश्यकच आहे.

**उपरोक्त सोबत जोडलेल्या विवरणपत्राची माहिती निरंक असली तरी निरंक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या विवरणपत्रासोबत खालील प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**प्रमाणपत्र**

मी, --------------------------------------- प्राचार्य, याद्वारे प्रमाणीत करण्यात येते की माझे पत्र क्रमांक ----------------------------- दिनांक ---------------------------- याद्वारे जी माहिती सादर करण्यात आलेली आहे ती माहिती मी स्वतः तपासली असून ती बरोबर आहे. सदर रक्कमा यापूर्वी संबंधीतांना अदा करण्यात आलेली नाही व मागणी करण्यात आलेली नाहीत तसेच सदर रक्कम प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय आहे व याबाबत खात्री केलेली आहे. या माहितीमध्ये काही फरक आढळल्यास अथवा शासनाकडून रक्कम येणे नसताना रक्कम प्रस्तावीत झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. तसेच आजअखेरपर्यंत या महाविद्यालयाकडून सोबत जोडलेल्या व्यक्तींच्या प्रस्तावाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कर्मचा-यांचा कोणताही प्रस्ताव थकित राहिलेला नाही.

स्वाक्षरी
महाविद्यालयाचे नांव व पत्ता

**सदरहू माहिती मध्ये कोणताही कर्मचारी वंचीत राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण आपली माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये आणि फॉन्ट साईझ १२ मध्ये हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीमध्ये (पेन ड्राईव्हमध्ये) तयार करुन ठेवावी. सदरह माहिती सादर करण्याबाबतचे ठिकाण, वेळ व दिनांक याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येत आहे.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

## STATEMENT 1

## STATEMENT SHOWING THE AMOUNT AMOUNT OF ARREARS FOR THE YEAR 2020-21

Name of the College –College Code - Hte Sevaarth Id -

| S.N. | Name of the Employee | Placement in Senior Scale/ Selection Grade | Period | Fidder Cadre | Period | M.Phil/ Ph.D. Increments | Period | L.T.C. | Period | Late University Approval | Period | Court Case | Period | Time Bound Promotions | Period | Others if any | Reasons | Period | **Total** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | | | | | | | | | | | | | |

Signature of the Principal with Stamp